"कलम 19 अधिसूचना"

क्र.काचि/क.लि/इवद/ 93 /2017
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)(इवद)
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- 17/06/2017

क्रमांक : भूसंपादन प्रकरण क्रमांक 01/2010-2011/मौजे जिगांव ता. नांदुरा जि. बुलडाणा

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम(१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक 900 दिनांक 20.10.2016 अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे जमिनीचे असल्यामुळे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी **"पुनर्वसाहत क्षेत्र"** म्हणून घोषीत करण्याची तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट करण्याची आवश्यकता नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (इ.वद.) बुलडाणा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - १
संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन
गाव : जिगांव तालूका : नांदुरा जिल्हा : बुलडाणा
भूसंपादन प्रकरण क्रमांक 01/2010-2011

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक | एकुण क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| 1 | 29 | 0.41 |
| 2 | 384 | 0.58 |
| 3 | 387 | 0.61 |
| | एकुण | 1.60 हे.आर. |
| **संपादनाचे प्रयोजन :- जिगांव प्रकल्पाचे धरण बैठक, बुडीत क्षेत्र, रस्ते व खदानी इ. कामाकरीता.** | | |

Scanned by CamScanner

अनुसूची - २

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव - जिगांव प्रकल्प

प्रकल्पकार्याचे वर्णन - जिगांव प्रकल्पाचे धरण बैठक, बुडीत क्षेत्र, रस्ते व खदानी इत्यादीचे कामाकरिता

समाजाला मिळणारे लाभ -

या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उदयोगधंदयांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मीती होणार असून ग्रामीण ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन, शेतमजुर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.

अनुसूची - ३

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गाव :जिगांव तालूका : नांदुरा जिल्हा : बुलडाणा

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक | एकुण क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | निरंक | |

अनुसूची - ४

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (इ.व द.)जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : 17/06 /2017.
ठिकाण : बुलडाणा.

(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
जिल्हाधिकारी बुलडाणा

Scanned by CamScanner